# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१६/०६/२०१६.

**१) ट्रकची मोटार सायकलला धडक, दोन जखमी. :–**

दिनांक १५/०६/२०१६ रोजी ०९.३० वा. दरम्यान ट्रक क्र. एमएच ३१ एपी ५१११ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरघाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपनाने चालवुन समोरून येणा–या बिना नंबरच्या यामहा मोटार सायकलला देव्हाडा बु. शिवार राज्य महामार्ग डांबरी रोडवर धडक मारून मोटार सायकल वरील दुशांत धरमदास गराडे वय २५ वर्ष व मागे बसलेला नंदकीशोर बांते वय २१ वर्ष दोन्ही रा. वडेगाव यांना जखमी करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादी रविंद्र वाल्मीक मुटकुरे वय २२ वर्ष, रा. कान्हळगाव यांचे व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. सलामे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**२) टाटा इंडिका गाडीची झाडाला धडक दिल्याने एक जखमी. :–**

दिनांक १०/०५/०१४ रोजी १८.४५ वा. दरम्यान टाटा इंडिका क्र. एमएच ३३ ए ०८६१ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपने चालवुन सोनी ते सावंगी जाणा–या राज्य मार्ग क्र. २७२ वरील रोडच्या कडेला असलेल्या करंजीच्या झाडाला धडक मारली त्यामुळे वाहनात बसलेला गणेश कृष्णाजी पुल्लरवार वय २८ वर्ष, रा. रेहाड व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाला. जखमीचे बयान डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखुंदर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. कुंभरे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) ट्रॅक्टरच्या चाकाखाली दबुन मुलाचा मृत्यु. :–**

दिनांक १५/०६/०१६ रोजी १९.३० वा. दरम्यान ट्रॅक्टर क्र. एमएच ३६/५४१९ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालविल्याने ट्रॅक्टरच्या मर्गड सिटवर बसुन असलेला हम्माल प्रेमराज सुरेश राऊत वय १९ वर्ष, रा. आमगाव हा बाम्हणी राज्य महामार्ग २७१ डांबरी रोडवर उसळुन खाली पडला, त्यामुळे त्याच्या डोक्याला मार लागला व त्याच्या अंगावरून ट्रॅक्टर ट्रॉलीचा चाक जावुन तो गंभिर जखमी झाला. त्याला उपचारा करीता ग्रा.रू. पवनी येथे आणले होते परंतु त्याला डॉ. ने तपासुन मृत घोषीत केले. असे फिर्यादी सुरेश केवट राऊत वय ५० वर्ष, रा. आदर्श आमगाव यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. बोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १५/०६/२०१६ रोजी १४.३० ते १५.०० वा. दरम्यान मिनीडोर क्र. एमएच ३५/२४०६ च्या आरोपी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन किटाडी फाटा अडयाळ येथे सार्वजनिक रोडवर येणा—या जाणा—या वाहतुकिस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर पो.स्टे. अडयाळ यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. बोरकर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १५/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १८३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०५ केसस, तिन सिटर वाहनांवरती १३ केसेस व इतर वाहनांवरती १६५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.